

श्री. संजय ग. मेहरे

(B.Com.,D.M.M.,LL.B.)

मा.धर्मादाय आयुक्त,

महाराष्ट्र राज्य मुंबई

श्री. मेहरे यांचा जन्म दि.२३/०३/१९६३ रोजी अकोला येथे झाला. त्यांनी त्यांचे संपूर्ण शालेय शिक्षण अकोला येथे पूर्ण केले. त्यांनी दि.३१/१२/१९८८ रोजी कायद्याची पदवी प्राप्त करून अकोला, अमरावती, बुलढाणा व वाशीम येथील जिल्हा न्यायालयात दिवाणी आणि फौजदारी स्वरुपाचे दावे आणि खटल्यांमध्ये पक्षकारांची बाजू मांडली. त्याचप्रमाणे, त्यांनी महसूल व कामगार न्यायिक प्रकरणांत देखील वकील म्हणून कार्य केले.

श्री. मेहरे हे दि. ०२/०५/२००८ रोजी जिल्हा व सहायक सत्र न्यायाधीश या पदावर पुणे येथील जिल्हा न्यायालयात न्यायिक सेवेत रुजू झाले. त्यांनी सदर पदावर नागपूर व वसई या ठिकाणी जिल्हा न्यायालयात कार्य केले. त्यांची दि. ०१/१०/२०१५ रोजी जिल्हा न्यायालय सिल्वासा व दमन येथे प्रधान जिल्हा न्यायाधीश या पदावर नियुक्ती झाली. त्यांनी पुढे जिल्हा न्यायालय गडचिरोली, नांदेड व औरंगाबाद या ठिकाणी देखील प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश या पदावर कार्य केले.

श्री. मेहरे हे दि. १८/०७/२०१९ रोजी पासून धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई या पदावर कार्यरत आहेत.